N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पालघर **P.S.(ठाणे):** मोखाडा **Year (वर्ष):** 2024
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0004 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/01/2024 00:53 बजे
2. **S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम)** **Sections (कलम)**
   1 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ 7
3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 08/01/2024
      **Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/01/2024
      **Time From (वेळेपासून):** 13:55 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 13:55 बजे

   **(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 09/01/2024 **Time (वेळ):** 00:31 बजे

   **(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
   **Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/01/2024 00:31 बजे
4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1. **(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 25 किमी
      **Beat No. (बिट क्र.):**

      **(b) Address (पत्ता):** परिमंडळ अधिकारी किनीरता कार्य,मोखाडा, 401604

      **(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
      **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** पालघर
      **District(State) (जिल्हा(राज्य)):** पालघर(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
   **(a) Name (नाव):** श्री.भगवान त्रंबक गुड
   **(b) Guardian's Name (पालक चे नाव) :**
   **(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1975 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   **(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   **(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
   **(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी स., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   **(h) Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | 00,सावर्डे, पोवाकडपाडा,मोखाडा,मोखाडा,पालघर,महाराष्ट्र,401604,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | 00,सावर्डे, पोवाकडपाडा,मोखाडा,मोखाडा,पालघर,महाराष्ट्र,401604,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9209711758

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भुषण आनंदा शेवरे | | | 1. महाकाली रोड,,सिडको नाशिक,एन-53/एजी 2/3/6, आशाध सेक्टर-5, नाशिक,नाशिक रोड,नाशिक शहर, महाराष्ट्र,भारत-422010 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम 30,000/ रुपये | 30,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 30,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकरमात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 08/01/2024. मी श्री.भगवान त्र्यबंक ग...ुड, वय 49 वर्षे, धंदा. शेती, रा मु.सावर्डे, पो.वाकडपाडा, ता.मोखाडा, जि.पालघर मो.क्र. 9209711758 असा असून समक्ष फिर्याद लिहून देतो की, मी वरील प्रमाणे असून माझी वडीलापार्जीत शेती करून तसेच माझ्या स्वतःचे मालकीचा ट्रक्टर क्र. एम.एच 48 बी.एच 5274 असुन तो चालवुन तसेच माझे शेतजमीनीत असलेली वाळू कधी-कधी काढून ती आमच्या गावातील लोकांना गरजेप्रमाणे विकतो. त्यातून माझे कुट ुबाचा उदरनिर्वाह करतो. मी दिनाक 21/12/2023 रोजी रात्री 08.00 वा. च्या सुमारास वैतरणा नदीच्या किनारी असलेल्या माझ्या मालकीच्या शेतजमीनीतून राहते घराच्या प्लास्टर करीता माझ्या मालकीच्या ट्रक्टर मधून रेती घेवून जात होतो. त्यावेळी किनीस्ता-वाकडपाडा रस्त्यावर किनीस्ता गावाशेजारी आल्यावर माझे समोरून मोटरसायकलवर वनविभागात नोकरी करणारे श्री.भुषण शेवरे, फारेस्ट गार्ड यांनी माझा ट्रक्टर अडवून माझा मोबाईल व ट्रक्टरची चावी स्वत:कडे घेतली व त्यांचे मोबाईलवरून फोन करून त्यांचे खोडाळा येथील साहेबांना माझे ट्रक्टर अडवलेल्या ठिकाणी बोलावून घेतले. श्री.शेवरे यांचे साहेबानी माझे नाव गाव विचारून रेती कुठुन आणली? असे विचारले. त्यावेळी मी त्याना माझ शेतातून आणल्याचे सांगीतले. त्यानतर त्या साहेबांनी श्री.शेवरे यांना माझेवर केस करून पंचनामा करा व माझे ट्रक्टर आफीसला जमा करा असे सांगीतले. व ते साहब तथून निघून गेले. त्यानतर श्री.भुषण शेवरे याना मी माझेवर केस करू नये म्हणून विनती केली. परतू त्यानी साहेबानी तुझ्यावर केस करण्यास सांगीतले असल्याने केस करावी लागेल असे सागून तु फारेस्टच्या जमीनीतुनच रेती काढलेली आहे, त्यामुळे आता तुझ्यावर गुन्हे काम करतो, तुझ्या ट्रक्टरचा पचनामा करून तुझ्यावर केस करतो व तुझे ट्रक्टर जमा करतो. असे सांगीतले. त्यानतर बराच वेळ मी त्याना केस न करण्यासाठी विनवणी केल्यानतर त्यानी मला जर तुझ्यावर केस करायची नसेल तर मला 1,00,000/- (एक लाख रूपये) आता लगेच दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळी मी त्याना दादा माइया स्वत:च्या घरासाठी वाळू नेत आहे असे सागतले. तेव्हा त्यांनी तु फारेस्ट च्या रस्त्यावरुन रेती नेत आहे. त्यामुळे तुझ्यावर केस करतो असे बोलले. त्यावर मी त्यांना मला कायदा माहीत नाही आणि सध्या माझेकडे एवढे पैसे पण नाहीत असे सागीतले. त्यावर श्री.शेवरे यांनी जेवढे असतील तेवढे जमा करून दे असे सागितले. त्या वेळी मी त्याना सध्या माझ्याकडे एवढे पैसे नसल्याने माझे नातेवाईक तसेच मित्रांकडून उसणे पैसे घ्यावे लागतील असे सांगितले. त्यानतर श्री.भुषण शेवरे यांनी मला त्यांच्या मोटारसायकलवर बसवून पैसे जमा करण्यासाठी किनीस्ते व वाकडपाडा येथे घेवून गेले. त्यावेळी मी माझे बहीण श्रीमती मिराबाइ शिंद हिच्याकडून 10,000/- रूपये माझा मित्र अशोक सराई याचेकडून 10,000/- रू व माझेकडील 10,000/- रू असे एकुण 30,000/-



Scanned with CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | मजबूत | 165.1-165.1 | गोरा | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Burn Mark | Place Of (का स्थान) Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

Scanned with CamScanner

फिर्याद

दिनांक ०९/०१/२०२४.

मी श्री.भगवान त्र्यंबक गुठे, वय ४९ वर्षे, धंदा शेती, रा.मु.सावर्डे, पो.वाकडपाडा, ता.मोखाडा, जि.पालघर मो.क्र. ९२०९७११७५८ असा असून समक्ष फिर्याद लिहुन देतो की,

मी वरीप्रमाणे असून माझी वडीलोपार्जीत शेती करुन तसेच माझ्या स्वतःचे मालकीचा ट्रॅक्टर क्र. एमएच ४८ बीएच ५२७४ असुन तो चालवुन तसेच माझे शेतजमीनीत असलेली वाळू कधी–कधी काढून ती आमच्या गावातील लोकांना गरजेप्रमाणे विकतो. त्यातून माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.

मी दिनांक २१/१२/२०२३ रोजी रात्री ०८.०० वा. च्या सुमारास वैतरणा नदीच्या किनारी असलेल्या माझ्या मालकीच्या शेतजमीनीतून राहते घराच्या प्लास्टर करीता माझ्या मालकीच्या ट्रॅक्टर मधून रेती घेवून जात होतो. त्यावेळी किनीस्ते–वाकडपाडा रस्त्यावर किनीस्ते गावाशेजारी आल्यावर माझे समोरुन मोटरसायकलवर वनविभागात नोकरी करणारे श्री.भुषण शेवरे, फॉरेस्ट गार्ड यांनी माझा ट्रॅक्टर अडवून माझा मोबाईल व ट्रॅक्टरची चावी स्वतःकडे घेतली व त्याने मोबाईलवरुन फोन करुन त्यांचे खोडाळा येथील साहेबांना माझे ट्रॅक्टर अडवलेल्या ठिकाणी बोलावून घेतले.

श्री.शेवरे यांचे साहेबांनी माझे नाव गाव विचारुन "रेती कुठुन आणली?" असे विचारले. त्यावेळी मी त्यांना माझे शेतातून आणल्याचे सांगीतले. त्यानंतर त्या साहेबांनी श्री.शेवरे यांना "माझेवर केस करुन पंचनामा करा व माझे ट्रॅक्टर ऑफीसला जमा करा" असे सांगीतले. व ते साहेब तेथून निघून गेले. त्यानंतर श्री.भुषण शेवरे यांना मी माझेवर केस करु नये म्हणून विनंती केली. परंतू त्यांनी साहेबांनी तुझ्यावर केस करण्यास सांगीतले असल्याने केस करावी लागेल असे सांगून "तु फॉरेस्टच्या जमीनीतुनच रेती काढलेली आहे. त्यामुळे आता तुझ्यावर गुन्हे दाखल करतो. तुझ्या ट्रॅक्टरचा पंचनामा करुन तुझ्यावर केस करतो व तुझे ट्रॅक्टर जमा करतो" असे सांगीतले. त्यानंतर बराच वेळ मी त्यांना केस न करण्यासाठी विनवणी केल्यानंतर त्यांनी मला "जर तुझ्यावर केस करायची नसेल तर मला १,००,०००/– (एक लाख रुपये) आता लगेच द्यावे लागतील" असे सागितले. त्यावेळी मी त्यांना दादा माझ्या स्वतःच्या घरासाठी वाळू नेत आहे असे सांगतले. तेव्हा त्यांनी तु फॉरेस्ट च्या रस्त्यावरुन रेती नेत आहे. त्यामुळे तुझ्यावर केस करतो असे बोलले. त्यावर मी त्यांना मला कायदा माहीत नाही आणि सध्या माझेकडे एवढे पैसे पण नाहीत असे सांगीतले. त्यावर श्री.शेवरे यांनी जेवढे असतील तेवढे जमा करुन दे असे सागितले. त्यावेळी मी त्यांना सध्या माझ्याकडे एवढे पैसे नसल्याने माझे नातेवाईक तसेच मित्राकडून उसणे पैसे घ्यावे लागतील असे सागितले.

त्यानंतर श्री.भुषण शेवरे यांनी मला त्यांच्या मोटारसायकलवर बसवून पैसे जमा करण्यासाठी किनीस्ते व वाकडपाडा येथे घेवून गेले. त्यावेळी मी माझे बहीण श्रीमती मिराबाई शिंदे हिच्याकडून १०,०००/– रूपये माझा मित्र अशोक सराई यांचेकडून १०,०००/– रु व माझेकडील १०,०००/– रु असे एकुण ३०,०००/– रक्कम मी त्यावेळी श्री.भुषण शेवरे, यांना दिले. त्यावेळी मी त्यांच्याकडे ३०,०००/– रूपये दिल्याची पावती मागीतली असता, त्यांनी "याची पावती मिळणार नाही. आणि उरलेले पैसे ऑफीसला घेवून ये." त्यावेळी मी त्यांना मला काय त्रास होणार नाही ना? असे विचारले असता त्यांनी मला "उरलेले पैसे ऑफीसला घेवून ये. नाहीतर पुन्हा तुझा ट्रॅक्टर पकडून तुझ्यावर केस करेन" आणि जर पैसे दिले तर "यापुढे तु विक्रीसाठी सुध्दा जेवढी रेती घेवून जायची असेल तेवढी फॉरेस्टच्या हद्दीतून घेवून जा. तुला काही अडचण येणार नाही."

अशा प्रकारे श्री.भुषण शेवरे, फॉरेस्ट गार्ड यांनी दिनांक २१/१२/२०२३ रोजी माझा रेतीने भरलेला ट्रॅक्टर सोडण्यासाठी व केस न करण्यासाठी १,००,०००/– (एक लाख रूपये) लाचेची मागणी करुन त्याच दिवशी माझेकडून ३०,०००/– रु घेतले व उर्वरीत रक्कम ऑफीसला घेवून येण्यास सांगीतले. परंतू मला श्री.भुषण शेवरे, फॉरेस्ट गार्ड यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांच्याविरुध्द कायदेशिर कारवाई होणेकरीता मा.पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पालघर यांच्याकडे दिनांक ०१/०१/२०२४ रोजी स्व.हस्ताक्षरात लेखी तक्रार दिलेली आहे.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषगाने अॅन्टी करप्शन ब्युरो, पालघर कार्यालयाचे पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी यांनी श्री.भुषण शेवरे हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत पंचासमक्ष दिनांक ०२/०१/२०२४ रोजी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले.

त्यानतर मी दिनांक ०२/०१/२०२४ रोजी दुपारी १३.३० वा. च्या सुमारास मौजे कारेगाव, ता. मोखाडा येथील शासकीय आश्रमशाळेच्या समोर माझेकडील ट्रॅक्टर क्रमांक MH 48, BH 5274 सह पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी यांना भेटलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी यांनी त्यांच्यासोबत शासकीय वाहनात असलेल्या पडताळणी पथकाची व पंचाची ओळख करुन दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी यांनी मला व दोन्ही पंचाना करण्यात येणा–या पडताळणी कारवाई बाबत थोडक्यात माहीती दिली.

त्यानतर पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी यांनी सागीतले की, तक्रारदार हे लोकसेवक यांना भेटण्यास जाणार असून तक्रारदार यांचे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच न. ०१ यांचेसोबत लोकसेवक यांचेकडे पाठवून लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यात येणार आहे. त्यानंतर सर्व कायदेशिर बाबींची पुर्तता झाल्यानतर पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी यांच्या सुचनेप्रमाणे माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच न. १ यांच्यासह श्री.भुषण शेवरे यांच्या कार्यालयात पाठविले. त्यावेळी पडताळणी पथक सदर ठिकाणी थांबून राहील. त्यानतर मी व पंच न. १ असे माझेकडील ट्रॅक्टरमधून परिमंडळ अधिकारी किनिस्ते कार्यालयासमोर गेलो. त्यावेळी कार्यालय बंद असल्याचे मला दिसले. त्यावेळी मी माझ्या मोबाईल नंबरवरुन श्री.भुषण शेवरे यांच्या मोबाईल नंबरवर फोन केला परंतू तो त्यांनी उचलला नाही. त्यानतर थोड्याच वेळात श्री.भुषण शेवरे यांचा माझे मोबाईलवर फोन आला. त्यावेळी मी फोन उचलून फोनचा लाउडस्पीकर सुरु करुन बोलणे केले. त्यावेळी श्री.भुषण शेवरे यांनी ते घरी जात असल्याचे सांगून मोरे दादाशी बोलून घ्या असे सागीतले. त्यावर मी त्यांना ऑफीसला कोणीच नाही असे सागीतले. तेव्हा त्यांनी "आता उदया पाहू" असे सागीतले. त्यानतर मी व पंच न.१ असे तेथून निघून ट्रॅक्टरने पडताळणी पथकाजवळ आलो. व घडलेली हकीगत सागीतली.

त्यानतर पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी यांनी श्री.भुषण शेवरे हे किती वाजता भेटणार आहेत त्याबाबत त्यांना फोन करुन खात्री करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे माझा मोबाईल क्रमांक ९२०९७११७५८ वरुन श्री.भुषण शेवरे यांचे मोबाईल क्र. ७६६६६११५४३५ वर फोन करुन फोनचा लाउडस्पीकर चालू करुन बोलणी केली. त्यावेळी मी "उदया भेटायला का कार्यालयात" असे विचारले असता श्री

Scanned with CamScanner

भुषण शेवरे यानी "वाकडपाड्याला आहेत का?.. वाकडपाड्याला येतो... रस्त्यावर थांब" असे बोलले. त्यावर मी त्याना किनिस्ता फाट्यावर येण्याची विनंती केली असता, त्यास त्यानी होकार दिला.

त्यानंतर माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. १ यांच्यासह मी माझेकडील ट्रॅक्टरने किनिस्ता फाट्याच्या दिशेने रवाना झाले. त्यावेळी पडताळणी पथक सदर ठिकाणी थांबून राहीले. मी किनिस्ता फाट्यावर गेल्यानंतर माझे मोबाईल नंबर वरून श्री.भुषण शेवरे यांच्या मोबाईलवर फोन केला असता त्यानी ते ऑफीसला आल्याचे सांगून ऑफीसला येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी व पंच नं. १ असे ऑफीसला गेलो. त्यावेळी त्याना संशय येवू नये म्हणून पंच नं. १ हे ऑफीसच्या बाहेर थांबून राहीले. त्यानंतर मी श्री.भुषण शेवरे यांची भेट घेवून माझे कामाबाबत बोलणी केली असता, श्री.भुषण शेवरे दादा यानी मला "हे बघा काय आहे जे काय असेल ना ते अजुन तुम्हाला द्यावे लागतील". "तुम्हाला जर चालणं आहे तर तुम्हाला करावं लागेल, नाय चालणं होईल तर तसं सांगुन द्या मग. मला काय नाय, बाधायचं असेल तर बाधुन देवु" असे बोलून "तुम्ही त्या दिवशी तीस दिलेत ना" असे म्हणून यापूर्वी माझेकडून तीस हजार रक्कम स्विकारल्याचे मान्य केले. त्यानंतर त्यानी मला" तेवढेच देवुन द्या मग अजुन तीस हजार रूपये" असे सांगीतले. त्यावेळी मी त्याना "थोडे फार ॲडजेस्ट करा" असे बोललो. तेव्हा त्यानी "नाय नाय, काहीच नाही, बरोबर आहे." असे म्हणून "तितकेच आहेत, तीस हजार होते, तीसच आहेत" असे म्हणून माझेकडे ३०,०००/- रु लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्याना "शनिवार चालेल ना" असे म्हणून शनिवारी येतो असे म्हणून मी व पंच नं. १ असे पडताळणी पथकाजवळ परत आलो. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी यानी सदरच्या भेटीदरम्यान व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेल्या संभाषण दोन्ही पंचासमक्ष एकले असता, त्यामध्ये श्री.भुषण शेवरे यानी माझे कामाच्या अनुषंगाने ३०,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. परंतू त्यावेळी माझेकडे ३०,०००/- रु रक्कम उपलब्ध नसल्याने लाचेचा सापळा आजमाविता आला नाही. त्याबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर मी दिनांक ०७/०१/२०२४ रोजी पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी याना फोन करून श्री.भुषण शेवरे यानी मागणी केलेली ३०,०००/- रू रक्कम माझेकडे उपलब्ध झाल्याचे सांगीतले. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी यानी दिनांक ०८/०१/२०२४ रोजी सापळा आजमाविण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर दिनांक ०८/०१/२०२४ रोजी दुपारी १२.०० वा. च्या सुमारास मौजे कारेगाव, ता. मोखाडा येथील शासकीय आश्रमशाळेच्या समोर माझेकडील ट्रॅक्टरसह मी पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी याना भेटलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी यानी त्यांच्यासोबत दोन्ही शासकीय वाहनात असलेल्या पोलीस उप अधीक्षक श्री.दयानंद गावडे व सापळा पथकाची माझेशी ओळख करून दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.शिरीष चौधरी यानी मला व दोन्ही पंचाना करण्यात येणाऱ्या सापळा पुर्व कार्यवाही बाबत थोडक्यात माहीती दिली. व त्यानंतर मी दिलेल्या ५००/- रु दराच्या ६० नोटा असे एकुण ३०,०००/- रु रक्कमेवर शासकीय वाहनामध्ये सापळापुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण केली. व अॅन्थ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम माझे शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यावेळी श्री.भुषण शेवरे यानी लाचेची रक्कम स्विकारल्यास माझे ट्रॅक्टरवर मजूर म्हणून काम करणारे श्री.भरत याचे नावाने हाक मारून "भरत ट्रॅक्टरमध्ये पाणी टाक" असे म्हणून सांगण्याचा इशारा करण्यास सांगीतले.

त्यानंतर माझे मोबाईल नंबरवरून श्री.भुषण शेवरे यांच्या मोबाईल नंबरवर फोन करून ते कोठे भेटणार याची खात्री केली असता, ते ऑफीसमध्ये असल्याचे समजले. सदरच्या मोबाईलदुवारे झालेले संभाषण व्हॉईस रेकॉर्डरदुवारे ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे.

त्यानंतर माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. ०१ तसेच सापळा पथकातील काही अधिकारी/कर्मचारी याना माझे ट्रॅक्टरवर काम करणारे मजूर म्हणून श्री.भुषण शेवरे यांच्या ऑफीसला पाठविले. व उर्वरीत सापळा पथक दोन्ही शासकीय वाहनातून वन विभाग, जव्हार मधील परीमंडळ अधिकारी, किनिस्ता यांच्या कार्यालयाच्या आजुबाजुला कोणास संशय येणार नाही अशा रितीने थांबून राहीले. त्याप्रमाणे आम्ही ट्रॅक्टरने श्री.भुषण शेवरे यांच्या ऑफीसच्या समोर जावून ट्रॅक्टर उभा केला. व मी ट्रॅक्टरमधून उतरून ऑफीसमध्ये जावून श्री.भुषण शेवरे यांची भेट घेतली, त्यावेळी पंच नं. १ हे बाहेरच्या रूममध्ये उभे होते. त्यावेळी त्यांच्याशी थोडा वेळ इतर बोलणे झाल्यानंतर श्री.भुषण शेवरे यानी "किती आहेत" असे विचारले असता, मी त्याना पुरे आहेत असे सांगीतले. त्यानंतर त्यानी ते बसलेल्या टेबलच्या उजव्या बाजुचा ड्रॉवर उघडून "खाली ठेव... इथंच ठेव ना" असे म्हटल्याने मी माझेकडील लाचेची रक्कम त्या ड्रॉवरमध्ये ठेवली. व त्यानंतर मी ऑफीसच्या दरवाज्यात येवून पुर्वनियोजीत इशारा म्हणून "भरत पाणी टाक ना तिकडे" असे बोललो. त्यावेळी लागलीच ट्रॅक्टरमध्ये असलेले सापळा पथकातील अधिकारी/कर्मचारी यानी श्री.भुषण शेवरे याना वन विभाग जव्हार च्या अखत्यारीत असलेल्या परीमंडळ अधिकारी किनिस्ता यांच्या कार्यालयात १३.५५ वा. च्या सुमारास रंगेहाथ पकडले. तसा सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी श्री.भुषण शेवरे, फॉरेस्ट गार्ड, परीमंडळ अधिकारी किनिस्ता याचे कार्यालय, वनविभाग जव्हार यानी मी वन विभागाच्या हद्दीतील रस्त्याचा वापर करून माझे ट्रॅक्टर मधून अवैधरित्या वाळू वाहतूक करीत असताना पकडल्याने माझेवर केस न करण्यासाठी व यापुढे माझा वाळू वाहतूकीचा व्यवसाय सुरळीत चालू देण्यासाठी माझेकडे दिनांक ०२/०१/२०२४ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान यापुर्वी माझेकडून ३०,०००/- रु स्विकारल्याचे मान्य करून पुन्हा आणखी ३०,०००/- रु लाचेची मागणी केली. व सदरची मागणी केलेली लाचेची रक्कम दिनांक ०८/०१/२०२४ रोजी १३.५५ वा. परीमंडळ अधिकारी किनिस्ता याचे कार्यालय, वनविभाग जव्हार येथे स्विकारली म्हणून माझी त्यांच्याविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

सदरची फिर्याद ही मी सांगितल्याप्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असून त्यानी प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहीली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

( शिरीष चौधरी )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर

ही फिर्याद लिहून दिली

( भगवान त्र्यंबक गुंड )

Scanned with CamScanner

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Pradip Ramanalh Gite(I (Inspector)) / API **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.). **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Pradip Ramanalh Gite

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): API



Scanned with CamScanner